ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाविलास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No 53.

वर्ष २६ | पुणें, बुधवार तारीख २० एप्रिल, १९६० | अंक १६

## विविध माहिती

**लहान मुलांसाठी चित्रपट**—इंडिअन चिल्ड्रेन्स फिल्म सोसायटीनें 'गुरुभक्ति' ह्या नांवाचा एक चित्रपट लहान मुलांच्यासाठी तयार केला आहे. ह्या चित्रपटाला इंग्रजी भाषेंतील टीकेची जोड देण्यांत येऊन तो ब्रिटनमधील चित्रपटगृहांत दाखविण्याची व्यवस्था होत आहे. मुलांच्या चित्रपटाविषयीं आस्था असणारे ब्रिटिश निर्माते लॉर्ड रँक ह्यांनीं वरील चित्रपटाबद्दल बरेंच औत्सुक्य दाखविलें आहे.

**प्रवास भत्त्याबाबत नवा नियम**—भारत सरकारच्या नोकरींत असलेल्या पतिपत्नींची एकाच ठिकाणीं व एकाच वेळीं बदली झाल्यावर ते बदलीच्या ठिकाणीं गेले तर त्यांना दोन माणसांचा प्रवासभत्ता न देतां एकाच माणसाचा द्यावयाचा असा नवा नियम करण्यांत आला आहे. एकाची बदली झाल्यावर ६ महिन्यांच्या आंत दुसऱ्याची बदली झाल्यासहि हा नियम लागू आहे.

**डबाबंद फळांचा कारखाना**—केरळ राज्यांत किलॉनपासून ३० मैलांवर डबाबंद फळांचा कारखाना काढण्यांत आला आहे. ह्या भागांत मुख्यतः अननस पिकतो. सुमारें ९,००० एकर जमिनींत अननस लावला जातो. अननसाच्या चकत्या डबाबंद करण्याच्या ह्या कारखान्यांत रोज ३०,००० पौंड फळ वापरण्यांत येतें.

**हॉटेलांच्या परवाना फींत वाढ**—मुंबई कॉर्पोरेशननें हॉटेल्स, रेस्टॉरंटस व रहाण्याच्या जागा ह्यांच्या मालकाकडून घेण्यांत येणाऱ्या परवाना-फींत वाढ करण्याचें ठरविलें आहे. ह्या वाढीबद्दल व हॉटेलमधील केरकचरा हलविण्याबद्दल जी मासिक फी आकारण्यांत येणार आहे, तीबद्दल हॉटेलच्या मालकांनीं तक्रारीचा ठराव मंजूर केला आहे.

**बेकारांची संख्या वाढणार**—पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस भारतांत बेकारांची जेवढी संख्या होती त्यापेक्षा दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस ती वाढलेली असेल असा अंदाज करण्यांत आला आहे. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस भारतांत ७५ लाखांच्या आसपास नोंदलेले बेकार असतील.

**कोचीन येथील बोटींचा कारखाना**—भारतामधील बोटी बांधण्याचा दुसरा कारखाना कोचीन येथें काढण्याच्या योजनेला नियोजन समितीनें मान्यता दिली आहे. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कालांत संकल्पित कारखान्यासाठी कांहीं रक्कम मंजूर करण्यांत येणार आहे. बोट बांधण्याचा पहिला कारखाना विजगापट्टम् येथें उभारण्यांत आलेला आहे.

**मध्यपूर्वेकडील व्यापार**—मध्यपूर्वेतील देशांत भारताचा माल अधिक प्रमाणांत खपावा म्हणून दोन जणांचें एक व्यापारी मंडळ त्या देशांच्या दौऱ्यावर गेलें आहे. भारतामधील मसाल्याचे पदार्थ व चहा ह्यांच्यासाठी बाजारपेठ मिळविण्याचा प्रयत्न मंडळ करणार आहे. मध्यपूर्वेतील व्यापाऱ्यांशीं व्यापारी संबंध प्रस्थापित केले तर त्या भागांतील भारताची निर्यात वाढण्याचा चांगला संभव आहे.

**गुजरातमधील तेलाचा सांठा**—गुजरातमध्यें संबायत नजिक सांपडलेला खनिज तेलाच्या सांठ्याचा अंदाज रशिअन तज्ज्ञांनी केला आहे. त्यांच्या मतानें संबायत विभागांत ४ कोटी टन तेलाचा सांठा आहे. त्यामधून दरसाल वीस लाख टन तेल उपलब्ध होऊं शकेल. राजस्थान, मुंबई, पंजाब व गंगेचें खोरें ह्या भागांतहि तेल सांपडण्याची शक्यता त्यांनीं ध्वनित केली आहे.

**नगर शहरासाठी दुधाचा पुरवठा**—अहमदनगरला आसपासच्या खेड्यांतून होणारा दुधाचा पुरवठा व त्याचें वांटप ह्यासंबंधीची व्यवस्था एका सहकारी संस्थेतर्फे होत आहे. आतां ह्या संस्थेनें दूध टिकविण्यासाठी व तें निर्जतुक करण्यासाठी लागणारी यंत्रसामुग्री घेण्याचें ठरविलें आहे. ह्या कामीं राज्यसरकारनें १॥ लाख रुपयांचें कर्ज व १ लाख रुपयांची मदत देण्याचें कबूल केलें आहे.

**माल खपत नाहीं म्हणून आपत्ति**—विरमगाममधील मच्छरदाण्या तयार करणाऱ्या एका गिरणीच्या चालकांनीं एप्रिल अखेर गिरणी बंद करण्याची नोटीस कामगारांना दिली आहे. गिरणी तोट्यांत चालत असून तयार झालेला मालहि बाजारांत सांठून राहिला आहे असें चालकांचें म्हणणें आहे. गिरणी बंद झाली तर ७५ कामगार बेकार होतील.

**आयुर्वेद व संतति-निरोध**—पंजाब सरकारच्या आयुर्वेद खात्याचे डायरेक्टर पं. कांति नारायण मिसर ह्यांनीं असें मत व्यक्त केलें आहे कीं, आयुर्वेदांत संततिनिरोधाचे पुष्कळ उपाय सांगितलेले आहेत. त्यांत तोंडानें घेण्यासारखीं कांहीं औषधेंहि आहेत असें त्यांचें म्हणणें आहे. वात्स्यायनाच्या कामसूत्राचा हवाला त्यांनीं दिला आहे.

**घटस्फोटाचे खटले**—गेल्या पांच वर्षांत विदर्भ भागांत ७२१ घटस्फोटाचे खटले कोर्टांत आले, व त्यांत घटस्फोट देण्यांत आला. नागपूर विभागांतून आलेल्या खटल्यांपैकीं बहुतेक खटले स्त्रियांकडून उपस्थित करण्यांत आले होते. चांदा जिल्ह्यांत सर्वांत कमी म्हणजे फक्त १५ घटस्फोट देण्यांत आले

**हिंदी टंकलेखकांना शिक्षण**—दरसाल २,००० हिंदी टंकलेखक व ५०० हिंदी लघुलेखक शिक्षण देऊन तयार करावयाचें असें मध्यवर्ती सरकारनें ठरविलें आहे. हें शिक्षण देण्यासाठी दिल्ली येथें दोन व मुंबई, कलकत्ता व मद्रास ह्या ठिकाणीं प्रत्येकी एक अशीं केंद्रें उघडण्याचा सरकारचा विचार आहे. लोकसभेच्या कामकाजासाठी त्यांची विशेष जरूर आहे.

**नॉन-गॅझेटेड नौकरांची सोय**—रेल्वेच्या नॉन-गॅझेटेड नौकरांसाठी एक रमणीय विश्रांति स्थान सालेमपासून २५ मैलावरील एका हवेच्या ठिकाणीं उभारण्यांत आलें आहे. हें गांव समुद्रसपाटीपासून ४,५०० फुटांवर वसलेलें असून तेथील निसर्ग-सौंदर्य लोभनीय आहे. सालेमपासून ह्या गांवीं जाण्यास उत्तम रस्ताहि आहे.

**सयामी तांदूळ मिळत नाहीं**—सयामकडून १ लाख टन तांदूळ विकत घेण्याच्या वाटाघाटी भारत सरकारचे अर्थ-खात्यांतील अधिकारी करीत होते. पण ह्या वाटाघाटी निष्फळ झाल्याचें समजतें. सयाममध्यें बांधण्यांत येणाऱ्या एका वीज-निर्मिती केंद्रासाठी तांदुळाच्या किंमतीच्या बदला यंत्रसामग्री द्यावी असें भारतानें सुचविलें होतें.

**मोठ्या उद्योगधंद्यांचीच गरज**—जागतिक बँकेच्या प्रतिनिधी मंडळाचे नेते मि. मायकेल हॉफमन ह्यांनीं असें मत व्यक्त केलें आहे कीं, औद्योगिक क्षेत्रांत भारताला इतर देशांशीं स्पर्धा करावयाची असल्यास मोठ्या उद्योगधंद्यांचीच अधिक गरज आहे. छोट्या उद्योगधंद्यांमुळें देश स्वयंपूर्ण होणार नाहीं व त्यांच्यामुळें बेकारीचा प्रश्नहि सुटणार नाहीं. छोट्या उद्योगधंद्यामुळें कोठल्याहि देशाचे औद्योगीकरण आजवर झालेलें नाहीं.

**रेल्वे खात्याची अंशतः स्वयंपूर्णता**—भारतामधील रेल्वे वहातुकीला लागणाऱ्या सामानापैकी कांहींच्या बाबतींत आतां स्वयंपूर्णता आलेली आहे. भारतामधून वाफेचीं एंजिनें, वाघिणी, प्रवासी डबे, इत्यादि माल आतां निर्यात करतां येणें शक्य आहे. इराक, पाकिस्तान व ब्रह्मदेश ह्या देशांकडून कांहीं विचारणाहि होत आहेत.

**सिनेमा धंद्यांतील 'काळा' पैसा**—सिनेमाच्या धंद्यांतील निर्माते, वितरक आणि सावकार ह्यांची एक सभा मुंबईत भरली होती. सभेला ५०० प्रतिनिधी हजर होते. सिनेमा धंद्यांत प्रख्यात नट, दिग्दर्शक आणि संगीत दिग्दर्शक ह्यांना दिल्या जाणाऱ्या अफाट 'काळ्या' पैशाविरुद्ध सभेंत ठराव मंजूर करण्यांत आला. फिल्मवर बसावण्यांत आलेला अबकारी कर 'काळा' पैसा देण्याच्या प्रथेमुळें बसला, असा समज आहे.


अन्नाचें रहस्य




बेडेकर मसाले, लोणचीं, पापड
ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.


★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★
दुकानें—गुरगमाट, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ
— द. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —

५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

★ सरदारगृह ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टीची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था
सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

किर्लोस्कर
स्थापना १८८८
इलेक्ट्रिक पंपिंग सेट



भारतीय शेतकरी आपल्या शेतीला पाणी पुरवठा करण्यासाठीं किर्लोस्कर पंपिंग सेटची निवड करतात. कारण ते अधिक काटकसरी, कार्यक्षम व खात्रीलायक आहेत. आपल्या कामीं योग्य आकाराच्या पंपाची निवड करून त्याचा भरपूर मोबदला मिळवा.

किर्लोस्कर ब्रदर्स लि. किर्लोस्करवाडी (द. सातारा)

# अर्थ

बुधवार, ता. २० एप्रिल, १९६०



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## वालचंदनगर कारखान्याचा विस्तार

वालचंदनगर येथील साखर-कारखान्याची यंत्रसामग्री तयार करणाऱ्या कारखान्याच्या विस्ताराची योजना हातीं घेण्यांत आली आहे. योजनेचें उद्घाटन करतांना मध्यवर्ती सरकारचे उद्योगमंत्री श्री. मनुभाई शहा म्हणाले कीं तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत देशांत १०५ साखर कारखाने असावेत व त्यांनीं दरसाल ३० लाख टन साखर निर्माण करावी अशी सरकारची अपेक्षा आहे. साखरेच्या कारखान्यांना लागणारी व इतर अनेक प्रकारच्या कारखान्यांना लागणारी यंत्रसामग्री तयार करण्याच्या कामीं वालचंदनगर येथील उद्योग-धंद्यांनीं चालविलेली कामगिरी स्पृहणीय आहे. भारत स्वतंत्र झाल्यापासूनच्या १२ वर्षांच्या काळांत औद्योगीकरणाचा पहिला टप्पा पूर्ण झाला आहे व आतां दुसऱ्या टप्प्याची वाटचाल सुरू झाली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. ह्या दुसऱ्या टप्प्यांत यंत्रसामग्रीच्या उत्पादनास प्राधान्य देण्यांत येत आहे. औद्योगीकरणाला लागणारें वातावरण आतां तयार झालेलें आहे. त्यामुळें पुढील कांहीं वर्षांत यंत्रसामग्रीच्या उत्पादनाच्या बाबतींत भारत आपल्या पायावर कसा उभा राहील ह्याचीच चिंता वाहणें जरूर आहे. औद्योगीकरणाला आलेला वेग असाच चालू राहिला तर तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीपर्यंत भारतांत उद्योग-धंद्यांना लागणारी ३०० कोटी रुपये किंमतीची यंत्रसामग्री दरसाल तयार होईल.

गेल्या कांहीं वर्षांत औद्योगिक उत्पादनांत झालेली वाढ लक्षांत भरण्यासारखी झालेली आहे. ह्या उत्पानवाढीला परदेशांचें साह्य ज्याप्रमाणें कारणीभूत झालेलें आहे त्याचप्रमाणें, पुढाकार घेऊन काम करणाऱ्या भारतामधील उद्योगपतींचे श्रमहि कारणीभूत झालेले आहेत. परदेशांचें साह्य भारताला सुलभतेनें मिळत गेलें आहे. भारताचें परराष्ट्रीय धोरणच ह्या सुलभतेचें कारण आहे. भारताच्या परराष्ट्रीय धोरणांत संकुचित राष्ट्रवादाचा गंध नाहीं. त्याचप्रमाणें राजकीय तत्त्वज्ञानावर आधारलेल्या सोयरीकीपासूनहि तें अलिप्त आहे. त्यामुळें कोणत्याहि परदेशाला भारताशीं सहकार्य करण्याचा दरवाजा नेहमींच खुला राहिला. गेल्या कांहीं वर्षांत सरकारनें परदेशीय तंत्रज्ञांचें साह्य लागणाऱ्या ६०० योजना मंजूर केलेल्या आहेत. जो जो देश आज औद्योगिक दृष्ट्या भारतापेक्षा पुढारलेला आहे त्या त्या देशाला येथें कार्य करण्यास वाव आहे. त्याचा परिणाम असा झाला आहे कीं, स्वातंत्र्यपूर्व कालापेक्षा स्वातंत्र्योत्तर कालांत भारतांत अधिक परदेशी नागरीक नांदत आहेत. यंत्रसामग्री तयार करण्याचा मोठा धंदा सुरू करण्याच्या कामीं लागणारी सर्व परिस्थिति आज भारतांत आहे. नवीन तंत्रविद्या शिकण्याची इच्छा येथील लोकांना आहे. त्याचप्रमाणें ती शिकण्यासाठी लागणारी बुद्धीहि आहे. ही तंत्रविद्या देशांतील परिस्थितीसाठी जुळती करून घेण्याची कुवतहि लोकांत आहे. भोपाळ येथें उभारण्यांत येणाऱ्या भारी विद्युत्-यंत्रसामग्रीचा कारखाना हें ह्याविषयींचें एक उदाहरण आहे. भोपाळ येथील कारखान्याच्या कामांत आज २,७०० एंजिनिअर्स व तत्रंज्ञ गुंतले आहेत, आणि ते अशा स्वरूपाचीं कामें करीत आहेत कीं जीं निदान दहा वर्षांपूर्वी तरी भारतांत होणें अशक्य समजलें जात होतें. हिंदुस्थान मशीन टूलसचा कारखानाहि अशा प्रकारचें दुसरें मोठें उदाहरण आहे. औद्योगिक यंत्रसामग्रीच्या बाबतींत भारत स्वयंपूर्ण होणें सहज शक्य आहे हें वरील दोन उदाहरणांवरून स्पष्ट झालेलें आहे.

---

## इंग्लंड व फ्रान्सला जोडणारा हुवा-बोगदा कीं पूल ?

इंग्लंड व फ्रान्स ह्यांच्यामध्यें खाडी पसरलेली असल्यामुळें इंग्लंड युरोप खंडांत असूनहि त्यापासून अलिप्त राहिलें आहे. पण ह्या खाडीखालून एक बोगदा खणून दोन्हीं देशांना खुषकीच्या मार्गानें जोडण्याची कल्पना फार वर्षांपासून इंजिनिअर्सच्या मनांत घोळत आहे. आतां ह्या कल्पनेला खो देणारी दुसरी एक योजना सुचविण्यांत येत आहे. ब्रिटिश, फ्रेंच व अमेरिकन अशा तीन कंपन्यांनीं खाडीवर पूल बांधण्याची कल्पना सुचविली आहे. त्यांच्या मतानें असा पूल बांधणें अगदीं व्यवहार्य आहे. अर्थात् हा पूल खाडीची रुंदी जेथें कमींत कमी असेल तेथेंच बांधावा लागेल. सामान्यतः ही खाडी पोहून जाण्याचा विक्रम करणारे जलतरणपटु जो मार्ग स्वीकारतात त्याच मार्गावर तो बांधला जाण्याचा संभव आहे. पुलाला फ्रान्समधील कॅलेपासून प्रारंभ होईल व तो डोव्हर येथें संपेल. रस्त्यावरून जाणाऱ्या वाहनासाठी ४९ फुटांचा रस्ता ठेवण्यांत येईल. ह्या रस्त्याच्या दोन्हीं बाजूला एक एक रेल्वे रस्ता असेल. त्याशिवाय सायकली व मोटारसायकली ह्यांच्यासाठींहि वेगळा अधांतरी मार्ग ठेवण्यांत येणार आहे. पुलाचें काम अवाढव्य असलें तरी त्याबाबतचे तांत्रिक प्रश्न फारसे अवघड नाहींत असें तज्ज्ञांचें मत आहे. खाडीखालून बोगदा खोदण्याच्या योजनेस सुमारें ११ कोटी पौंड खर्च येईल असा अंदाज करण्यांत आला होता. पुलासाठी येणाऱ्या खर्चाचा अंदाज २० कोटी पौंड करण्यांत आला आहे. पुलाच्या पुरस्कर्त्यांचें असें मत आहे कीं, पूल हा कमी धोक्याचा मार्ग होईल आणि तो नीट ठेवण्यास खर्चेहि कमी येईल. पूल बांधण्यांत आला तर त्यासाठी ८ लाख टन पोलाद लागेल.

---

**दिल्लीजवळ टायर्सचा कारखाना**—गुडइअर रबर कंपनी दिल्लीपासून २५ मैलांवर टायर्स तयार करण्याचा कारखाना काढणार आहे. मोटारींना लागणाऱ्या, ट्रॅक्टर्सना लागणाऱ्या, विमानांना लागणाऱ्या ७०० टायर्स ह्या कारखान्यांत रोज तयार होतील. कारखान्याच्या उभारणीसाठी ६ कोटी रुपये लागतील. कारखान्यांतील प्रत्यक्ष उत्पादनास १९६१ मध्यें प्रारंभ होईल.

## पोस्ट-तिकिटांनीं शाळा बांधली

लेखक :—श्री. श्री. वा. काळे

सरकारी किंवा म्युनिसिपल शाळांच्या इमारती बांधल्या जातात, त्या कर आणि पट्ट्या यांच्या उत्पन्नांतूनच. देशांतील नागरिकांकडून मिळणाऱ्या पैशांतूनच त्यांचा खर्च भागविला जातो. पॅसिफिक महासागरांत, पेरू आणि न्यूझीलंड यांच्यापासून सारख्या अंतरावर पिटकर्न नांवाचें एक छोटेंसें बेट आहे. तेथील एकमेव शाळेची इमारत मात्र अभिनव मार्गानें उभारण्यांत आली आहे. पोस्टाचीं खास तिकिटें काढून आणि तीं सबंध जगांतील छांदिष्टांना विकून लक्षावधि रुपये मिळविण्यांत आले आणि त्याचा विनियोग शाळागृहासाठीं करण्यांत आला. पोस्टाचीं तिकिटें जमविणारे ह्या तिकिटांवर तुटून पडले आणि त्यांनीं लक्षावधि तिकिटें वापरण्यासाठीं नव्हे, तर शौकाखातर खरेदी केलीं.

१९४० पूर्वी पिटकर्न बेटाच्या पोस्टाची व्यवस्था न्यूझीलंडच्या सरकारकडे होती. त्या बेटाचें क्षेत्रफळ अवघें दोन चौरस मैल आणि त्यांत सुमारें १५० नागरिक असल्यामुळें, त्यांना एकमेकांशीं पत्रव्यवहार करण्यासाठीं टपालाच्या सोईची आवश्यकताच नव्हती. पण जगांतील इतर ठिकाणीं पत्रें पाठवायला लागलीं, तर बेटाला एखादी आगबोट लागेल, तेव्हांच तें शक्य व्हावयाचें.

वेस्ट इंडीजमधील मळ्यांतील गुलामांसाठी येणाऱ्या अन्नखर्चात बचत व्हावी, ह्या दृष्टीनें १७८९ मध्यें "बौंटी" ह्या ब्रिटिश युद्धनौकेकडे एक कामगिरी सोपविण्यांत आली. ह्या नौकेनें ओटेहीटमधून ब्रेडफ्रूटचीं झाडें आणावीं आणि त्याची लागवड वेस्ट इंडीजमध्यें करण्यांत यावी, अशी योजना होती. नौकेचा कप्तान, लेफ्टेनंट विल्यम ब्लिग ह्याच्या जुलमाला कंटाळून, त्याच्या हाताखालील खलाशांनीं बंड पुकारलें आणि ह्या बंडखोरांनीं ब्लिग आणि त्याचे मदतनीस ह्यांना समुद्रांत ढकलून दिलें. ते सर्व बचावले आणि १२०० मैल अंतरावरील टिमोरला गेले. इकडे, ह्या बंडखोरांनीं टाहिटीच्या कांहीं स्थानिक स्त्रियांना बोटीमध्यें घालून पिटकर्न हें बेट गाठलें आणि तेथें वसाहत केली; तेथील प्रजा वाढवली. १८०८ मध्यें एक अमेरिकन बोट चुकून ह्या बेटाला लागली, तोंपर्यंत त्या बेटाचा जगाशीं कांहींहि संबंध नव्हता.

एकमेकांतील वैर आणि कलागती ह्यांच्यामुळें कांहीं वर्षांनीं फक्त एकच श्वेतवर्णीय पुरुष त्या बेटावर उरला, त्याचें नांव होतें अलेक्झँडर स्मिथ. त्यानें जॉन ॲडॅम्स हें नांव धारण केलें, आणि "बौंटी" वरचें बायबल आणि प्रार्थनापुस्तक ह्यांचा उपयोग करायला लागून तो धर्मोपदेशक बनला! १८३९ मध्यें एका अमेरिकन खलाशानें हें जीर्ण बायबल घेऊन त्याचे बदलीं नवीन बायबल दिलें. "बौंटी" वरील बायबल पुढें कनेक्टिकट हिस्टॉरिकल सोसायटीनें मिळवून आपल्या संग्रहांत जतन करून ठेवलें; तें पिटकर्न बेटाला १९४९ मध्यें परत करण्यांत आलें.

पिटकर्न बेटावरील शाळेला १९४९ पर्यंत स्वतःची अशी चांगली इमारत नव्हती. त्या वर्षी मात्र एक मोठें शाळागृह बांधण्यांत आलें आणि त्याच्याच शेजारीं शिक्षकासाठीहि एक घर बांधण्यांत आलें, त्याला लागणारा पैसा १९४० सालापासून वेळोवेळीं काढण्यांत आलेल्या पोस्टाच्या तिकिटांच्या विक्रींतून मिळाला. ह्या शाळेंत सुमारें २५ विद्यार्थी आहेत. न्यूझीलंडमधील शालेय अभ्यासक्रम येथें अनुसरला जातो. शाळेला एकच शिक्षक असतो; त्याची पत्नी मुलींना शिवणकाम, विणकाम, संगीत, इत्यादि हौसेनें शिकवितें. प्रत्येक दोन वर्षांनीं ऑस्ट्रेलिया किंवा न्यूझीलंड येथून नवा शिक्षक बदलून येतो. ह्या शिक्षकाला शाळेच्या कामाबरोबर इतरहि अनेक सरकारी व निमसरकारी कामें करावीं लागतात.

शालागृहाच्या उभारणीसाठी ½ पेनी ते २ शिलिंग ६ पेन्स अशा वेगवेगळ्या आठ तिकिटांची मालिका काढण्यांत आली. "बौंटी" वरील बंड, फ्लेचर ख्रिश्चिअन आणि त्याचे सहकारी ह्यांनीं बेटावर केलेली वसाहत, इत्यादींचें चित्रीकरण ह्या तिकिटावर आकर्षक रीतीनें करण्यांत आलें आहे. आठहि तिकिटांची मिळून किंमत ४ शिलिंग, ६ पेन्स होती; असे लक्षावधि सेट्स जगभर खपले. ह्या तिकिटांचा टपालासाठी उपयोग करण्यांत आला नाहीं; छंद म्हणून तिकिटें जमविणारांच्या संग्रहीं तीं शिल्लक आहेत. ३ पेन्सच्या तिकिटावर पॅसिफिक महासागराचा नकाशा होता, तर ६ पेन्सच्या तिकिटावर "बौंटी" नौकेचें काल्पनिक चित्र होतें. ह्या नौकेचा, बरेंच दूषण मिळालेला कप्तान लेफ्टेनंट विल्यम ब्लिग आणि "बौंटी" ह्या दोघांचें दर्शन २ पेन्सच्या तिकिटावर घडविण्यांत आलें होतें. एका पेनीच्या तिकिटावर ब्रेडफ्रूटचें झाड काढलेलें होतें. १½ पेन्सच्या तिकिटावर जॉन ॲडॅम्स व त्याचें घर हीं दिसत होतीं. ४ पेन्सच्या तिकिटावर एक "बौंटी" बायबल दाखविण्यांत आलें होतें. १९४९ मध्यें काढलेल्या ८ पेन्सच्या तिकिटावर एका आधुनिक इमारतीचें चित्र होतें आणि त्या वर "शाळा, १९४९" असे शब्द छापले होते. १९५७ मध्यें काढलेल्या तिकिटावर एक इमारत आहे, तिला "पिटकर्न स्कूल" असें म्हटलें आहे. वास्तविक, तें शालागृह नसून, त्याच्या शेजारचें शिक्षकाचें घर आहे. फिजीमधील जबाबदार अधिकाऱ्यांनीं त्या तिकिटाला संमति दिली होती. तेव्हां ती चूक कशी राहून गेली कुणास ठाऊक! नोव्हेंबर १९५९ मध्यें तेंच तिकीट पुन्हा काढण्यांत आलें आणि "पिटकर्न स्कूल" ऐवजीं "शिक्षकाचें घर" असे शब्द छापण्यांत आले. पिटकर्न शाळेचा शिक्षक मि. ह्यूबर्ट ह्याला त्याचा खूपच अभिमान वाटतो. पोस्टाच्या तिकिटावर स्वतःच्या घराचें चित्र असणारा सबंध जगांत तो एकमेव शिक्षक आहे!

[केसरी, १०-४-१९६०]

---

**अमरावती येथें सायकलींचा कारखाना**—विदर्भांत अमरावती येथें सायकली तयार करण्याचा कारखाना उभारण्यांत येत आहे. ह्या कारखान्यांत दरमहा १,००० सायकली तयार होऊं शकतील. कारखान्याची यंत्रसामग्री पश्चिम जर्मनींतून मिळविण्यांत आली असून ब्रिटिश तज्ज्ञांच्या मदतीनें तिची जुळणी चालू आहे.

**भिलईमधील कामगारांना नोटिसा**—चालू वर्षअखेरपर्यंत भिलईंत काम करणाऱ्या सुमारें २५,६०० कामगारांना टप्याटप्यानें नोटिसा देण्यांत येणार आहेत. त्याशिवाय १ एप्रिलपासून ५,०१७ कामगारांना कामावरून कमी करण्यांत आलें आहे. ह्या कामगारांना इतरत्र चालू असलेल्या मोठ्या कामावर रोजगार देण्याची खटपट करण्यांत येत आहे.

## साखरेच्या उत्पादनांत व खपांत प्रचंड वाढ

भारतांतील साखरधंद्यास १९३२ मध्ये संरक्षण देण्यांत आल्यापासून त्या धंद्यानें आश्चर्यकारक म्हणतां येण्यासारखी प्रगति केली आहे. गेल्या दहा वर्षांत साखरेचें उत्पादन आणि खपहि सुमारें १०० टक्क्यांनीं वाढला असून तिसऱ्या पंचवार्षिक योजनेअखेरीस देशांतील साखरेसाठी होणारी मागणी सुमारें ३० लक्ष टनांवर जाईल असें टॅरिफ कमिशनच्या 'कॉस्ट स्ट्रक्चर ऑफ शुगर ॲण्ड फेअर प्राईस पेएबल टु दि शुगर इंडस्ट्री' यावरील अहवालांत म्हटलें आहे.

सन १९४८-४९ मध्यें साखरेचा खप ११,८५,००० टन होता तो १९५८-५९ मध्यें जवळजवळ २१,८०,००० टनांवर गेल्या. जनतेचा राहणीमानाचा दर्जा जसजसा वाढत जाईल आणि गूळ व खांडसरी ऐवजीं शुभ्र साखरेचा वापर करण्याची प्रवृत्ति जसजशी क्रमशः वाढेल तसतसें खपाचें मान वाढत जाईल. लोकसंख्येंत वाढ हें अर्थातच साखरेच्या खपांत वाढ होण्याचें आणखी एक कारण आहे.

या दहा वर्षांत साखरेचें उत्पादन दशलक्ष टनांवरून १९.८ लक्ष टनांवर गेलें, १९३०-३१ मध्यें साखर कारखान्यांची संख्या फक्त २९ होती ती १९५७-५८ मध्यें १५७ वर गेली आहे.

टॅरिफ कमिशननें ही चौकशी भारत सरकारच्या २० सप्टेंबर १९५८ च्या ठरावानुसार केली. कमिशनला या चौकशींत (१) साखर उत्पादन खर्चाचें मान (२) साखर कारखान्यांना द्यावयाची साखरेची वाजवी किंमत व (३) साखरधंद्यांत जुन्याऐवजीं नवीं यंत्रें वगैरे बसविण्यासाठी येणाऱ्या खर्चासाठी व नफा राहण्याकरितां कांहीं थोडा वाव ठेवण्याची साखर धंद्याची मागणी इ. प्रश्नांचा परामर्श घ्यावयाचा होता.

तदनुसार कमिशननें साखर उत्पादन खर्चाच्या प्रश्नाची चौकशी करण्यासाठी पश्चिम उत्तर प्रदेशांतील १२, पूर्व उत्तर प्रदेशांतील १०, उत्तर बिहारमधील ८, दक्षिण बिहारमधील १, मुंबई राज्यांतील ६, मध्य प्रदेश राज्यांतील २, आंध्र प्रदेश राज्यांतील ४, पंजाबांतील २ व मद्रास, म्हैसूर व राजस्थान राज्यांतील प्रत्येकी १ मिळून एकूण ४८ प्रमुख कारखान्यांची निवड केली.

या चौकशींत कमिशनला असें आढळून आलें कीं, निरनिराळ्या विभागांत उसापासून पडणाऱ्या साखरेचें प्रमाण एकच धरून आणि हंगामाची मुदत एकच धरून उत्पादनखर्चाबाबतचें अखिल भारतीय कोष्टक तयार केल्यास तें वस्तुस्थितिनिदर्शक होणार नाहीं. उलट त्यामुळें अखिल भारतीय खर्चाचा प्रस्थापित आंकडा फुगलेलाच दिसेल.

त्यासाठी या कमिशननें साखर उत्पादन करणाऱ्या राज्यांचे पुढीलप्रमाणें चार विभाग धरले आहेत. (१) उत्तर विभाग-बिहार, उत्तर प्रदेश व पंजाब (२) मुंबई राज्य (३) मध्य प्रदेश व राजस्थान (४) दक्षिण विभाग-आंध्र प्रदेश, म्हैसूर व मद्रास, केरळ, पश्चिम बंगाल व ओरिसा या राज्यांतील एकेकच कारखाना या प्रश्नासंबंधांत विचारांत घेतला असल्यानें त्यांचा या विभागणींत समावेश करण्यांत आला नाहीं.

अशा रीतीनें या अहवालांत चार प्रादेशिक कोष्टकें देण्यांत आलीं आहेत. प्रत्येक कोष्टकांत उंसाची किंमत वगळून कारखान्यांत साखर तयार करण्यासाठी आलेला खर्च दाखविण्यांत आला आहे. या खर्चमानासंबंधांत कमिशनची मुख्य शिफारस अशी आहे कीं, साखरेची किंमत प्रत्येक विभागांत प्रादेशिक कोष्टकानुसार उसापासून पडणारा साखरेचा उतारा व हंगामाची मुदत यांनुसार ठरविण्यांत यावी.

कमिशननें केलेली दुसरी एक महत्त्वाची शिफारस अशी कीं साखरेच्या वाजवी विक्री किंमतींत साखर धंद्यांतील सर्व कारखान्यांच्या बाबतींत जुन्याऐवजीं नवीं यंत्रें बसविणें इ. साठी सर्व कारखान्यांस द्यावयाच्या मदतीची एकाच प्रकारची तरतूद करण्यांत येऊं नये. यासंबंधांत 'अहवालांत असें म्हटलें आहे कीं एकूण १२३ कंपन्यांच्या एकत्रित ताळेबंदांवरून दिसून येणाऱ्या आर्थिक परिस्थितीवरून तसेंच निरनिराळ्या प्रदेशांतील कारखान्यांच्या गटवार हिशेबांवरून गेल्या चार वर्षांत धंद्यानें चांगली कामगिरी केली आहे हें स्पष्ट होतें. या धंद्याकडे भरपूर साधनें असून त्यांचा बाहेरील मुदतीसुद्धां चालू कारखान्यांच्या विकासासाठी व नवीन कारखान्यानें स्थापण्याकरितां उपयोग करण्यांत आला. वाढत्या धंद्यास साह्य करणें हें अत्यावश्यक आहे यांत संशय नाहीं, परंतु हें साह्य मागील वर्षांतील घसारा तरतुदींतूनच प्रामुख्यानें केलें पाहिजे असें या अहवालांत पुढें म्हटलें आहे.

साखरधंद्यांतील सर्व कारखान्यांस नूतनीकरणासाठी वगैरे येणाऱ्या खर्चासाठी साखरेच्या वाजवी विक्री किंमतींत त्यासाठी तरतूद करण्याचें कारण नसून ज्या कारखान्यांतील यंत्रसामुग्रीचें आयुष्य संपुष्टांत आल्यानें अथवा अन्य कांहीं कारणांमुळें त्यांस मदत पाहिजे असल्यास त्याबाबत संबंधित कारखान्यानें स्वतंत्रपणें कैफियत सादर करावी आणि सरकार सुती कापड व ताग गिरण्यांच्या आधुनिकीकरणासाठी व नूतनीकरणासाठी ज्या धर्तीवर त्यांस साह्य देतें त्या धर्तीवर अशा कारखान्यांस साह्य देण्याची व्यवस्था करावी असें या अहवालांत म्हटलें आहे.

---

## भारताला लांब मुदतीच्या कर्जाची जरूरी

जागतिक बँकेच्या तिघा प्रतिनिधींचें एक मंडळ भारताची औद्योगिक व आर्थिक पाहणी करण्यासाठी भारतांत आलें होतें. ह्या मंडळानें आपला अहवाल आतां पुरा केला आहे. आर्थिक नियोजन करण्याच्या कामीं भारतानें जी पद्धति स्वीकारली आहे तिची प्रशंसा अहवालांत करण्यांत आली असून, पाहणींत गोळा केलेल्या माहितीच्या आधारें कांहीं उद्बोधक निष्कर्ष काढण्यांत आले आहेत. दुसऱ्या महायुद्धानंतर युरोपांतील आर्थिक घडी पार विस्कटून गेली होती. ती पुन्हा नीट बसविण्यासाठी मार्शल योजना अंमलांत आणण्यांत आली. पण, अशा प्रकारची योजना भारताला उपयुक्त ठरणार नाहीं असा अभिप्राय अहवालांत व्यक्त करण्यांत आला आहे. अहवाल पुढें म्हणतो कीं, भारताला आपला विकास करून घेण्यासाठी बराच काळ लागणार आहे. भारतापुढील आजचे दोन प्रमुख प्रश्न म्हणजे अन्नधान्याच्या उत्पादनांत वाढ आणि औद्योगीकरण. औद्योगीकरण जवळ जवळ सुरुवातीपासूनच करावें लागणार आहे. भारताला बाहेरून मिळणाऱ्या मदतींत सुसंगति राखली गेली पाहिजे. ज्या देशाकडून मदत मिळतें त्या देशांकडून माल विकत घेणें मदत घेणाऱ्या देशाला परवडेलच असें नाहीं, हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे. मदत देणाऱ्या व घेणाऱ्या देशांनीं परस्पर विचारविनिमय करणें जरूर आहे. भारताला दीर्घ मुदतीच्या कर्जाची गरज तर आहेच. पण हीं कर्जे घेणाऱ्या देशाची कर्जे फेडण्याची पात्रताहि पाहिली पाहिजे. मामुली मदतीप्रमाणेंच कांहीं कारणानें अन्नधान्याची पिकें हातीं न आल्यास खास मदतहि देण्यांत आली पाहिजे. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत शेतीच्या सुधारणेला अधिक प्राधान्य देण्यांत आलें पाहिजे.

## वालचंद स्मृति-व्याख्यानमालेचें उद्घाटन

### श्री. गगनविहारी मेहता ह्यांचें भाषण

औद्योगिक विकासाला विधायक दृष्टीची आणि धाडसाची जशी आवश्यकता आहे तशीच सामाजिक जबाबदारीच्या जाणिवेचीहि अत्यंत जरूरी आहे, असे उद्गार श्री. गगनविहारीलाल मेहता, इंडस्ट्रियल क्रेडिट आणि इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशनचे अध्यक्ष, यांनीं महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्समध्यें बोलतांना काढले.

श्री. मेहता महाराष्ट्र चेंबरनें सुरू केलेल्या वालचंद स्मृति-व्याख्यानमालेचें उद्घाटन चेंबरच्या डहाणूकर सभागृहामध्यें करीत होते. या प्रसंगीं बरेच प्रमुख उद्योगपति व व्यापारी उपस्थित होते. पाहुण्यांचें स्वागत करतांना चेंबरचे अध्यक्ष श्री. कृ. ह. ढमढेरे यांनीं व्याख्यानमालेचा हेतु समजावून सांगितला. ते म्हणाले कीं, कै. श्री. वालचंद हिराचंद यांच्या स्मरणार्थ प्रतिवर्षी हीं व्याख्यानें करण्याचें चेंबरनें ठरविलें आहे. कै. वालचंदजी हे या चेंबरचे संस्थापक व अकरा वर्षे अध्यक्ष होते. त्यांना अत्यंत प्रिय असलेल्या विषयावर-म्हणजे देशाच्या आर्थिक, औद्योगिक, व्यापारविषयक, सांपत्तिक आणि शेतकीचा विकास इ. विषयांवर-हीं व्याख्यानें व्हावयाचीं आहेत. व्याख्यानाकरितां प्रमुख व अधिकारी व्यक्तींना निमंत्रण देऊन त्यांचीं व्याख्यानें स्वतंत्र ग्रंथरूपानें प्रसिद्ध करण्याची चेंबरची योजना आहे.

श्री. वालचंदांनीं जमीन, पाणी आणि आकाश या तिन्हीं क्षेत्रांत अग्रेसरत्व पटकावलें होतें. या देशांतील आर्थिक व्यवस्थेसंबंधी लोकमत बनविण्याच्या कामीं साह्यभूत असलेल्या औद्योगिक व व्यापारी संस्थांमध्यें त्यांचें फार वजन होतें.

मोठ्या प्रमाणावर बांधकाम करणाऱ्या कंपन्या, जहाजांची वाहतूक करणाऱ्या संस्था, मोटारी व विमानें तयार करण्याचे कारखाने, साखरेचे कारखाने इत्यादि निरनिराळे उद्योग सुरू करण्यासाठी श्री. वालचंदजींनीं कसून प्रयत्न केले. श्री. वालचंद यांच्या अंगीं असलेल्या दूरदृष्टि, धाडस आणि विलक्षण धडाडी या गुणांमुळें हिंदुस्थानाच्या औद्योगिक विकासाच्या क्षेत्रांत श्री. वालचंद हे विलक्षण गतिमान व सामर्थ्यशाली शक्ति बनले होते.

त्यांच्या निरनिराळ्या उद्योगापासून कोणते धडे शिकण्यासारखे आहेत? आज औद्योगिक विकासाला विधायक दूरदृष्टि आणि धाडस यांची अत्यंत आवश्यकता आहे. सांपत्तिक मदत तर अवश्य पाहिजे पण त्यापेक्षांहि अधिक गरज शास्त्रीय व तांत्रिक ज्ञानाची आणि कार्यदक्षतेची आहे.

इतर देशांतील मोठमोठ्या औद्योगिक व व्यापारी संस्थांचा कारभार मुख्यतः त्या विषयांतील तज्ज्ञांच्या हातीं असतो. औद्योगिक कार्यांत यश मिळवावयाचें असेल तर संघटना काळजीपूर्वक केली पाहिजे आणि व्यवस्थेंत प्रामाणिकपणा पाहिजे. सांपत्तिक नफा आणि उत्पादनाची पातळी साध्य करण्याबरोबरच गुणांतहि प्रगति झाली पाहिजे.

सध्यांच्या उद्योगवाढीच्या कार्याबरोबरच औद्योगिक संघटनेचा पाया मजबूत करण्याचे जे आवश्यक, पण आकर्षक नसलेलें कार्य आहे त्याकडे दुर्लक्ष होता कामा नये. तांत्रिक ज्ञान आणि कौशल्य यावांचून उपलब्ध साधनसामग्रीचा योग्य उपयोग किंवा विकास होत नाहीं. हें ज्ञान आणि कौशल्य स्वर्गीय देणगी म्हणून मिळत नाहीं किंवा परदेशांतून उसनवारीनेंहि आणतां येत नाहीं. आर्थिक विकासासाठी सामाजिक शिस्त आणि काबाडकष्ट यांची जरूरी आहे. भांडवल साठविण्यासाठी प्रोत्साहन अवश्य पाहिजे. पण बचत करणें आणि भांडवल गुंतविणें याविषयीं एक विशिष्ट दृष्टिकोन असावा लागतो. नव्या तांत्रिक क्रियांचा व कौशल्यांचा आणि नव्या जीवनपद्धतीचा स्वीकार करण्याची लोकांची तयारी असली पाहिजे. तांत्रिक कार्यक्षमता आणि साधनसामग्रीचा योग्य उपयोग करण्याची पात्रता या गुणांचें महत्त्व विशेष आहे. अमेरिकेंतील सध्यांची ही तेथील लोकांच्या तांत्रिक ज्ञानाची व काबाडकष्टाची फलश्रुति होय.

सध्यांच्या सामायिक भांडवलावर आधारलेल्या आर्थिक संघटनेला खाजगी क्षेत्र असें संबोधण्यांत येतें. पण तिला एक सार्वजनिक बाजू आहे आणि तींत अनेक कायदेशीर जबाबदाऱ्या अभिप्रेत आहेत. साहसी लोक जेव्हां नवीन उद्योगधंदे सुरू करतात तेव्हां त्यांचा हेतु केवळ खाजगी नफा मिळविण्याचाच नसतो. या उद्योगांत त्यांना जोखीम पत्करावी लागते. खाजगी नफा मिळविण्याच्या हेतूखेरीज एखादा नवा कारखाना सुरू केल्याचें, एखादें शेत नांगरल्याचें किंवा एखादी खाण चालू केल्याचें समाधान नसेल तर निव्वळ नफ्यातोट्याच्या हिशेबावर आधारून उद्योगधंद्यांत भांडवल गुंतविण्याची इच्छा कोणालाहि फारशी होणार नाहीं. असें नवनिर्मितीचें समाधान कलाकाराप्रमाणेंच याहि लोकांना हवें असतें. त्यांचे हेतु कदाचित् निर्भेळ नसतील पण नवीन उद्योग सुरू करण्यामध्यें परस्परांतील स्पर्धा, प्रतिष्ठेची कल्पना, निर्मितीचा आनंद, अभिमान आणि यश व सत्ता मिळविण्याची आकांक्षा इत्यादि अनेक भावनांचा समावेश असतो.

खाजगी उद्योगधंद्यांचें क्षेत्र टिकवून वाढवावयाचें असेल तर या क्षेत्रांतील व्यक्तींनीं आपले उद्योग सामाजिक आवश्यकतेच्या आधारावर चालविले पाहिजेत आणि भांडवलाचा पुरवठा करणारे, गिऱ्हाईक आणि शारीरिक अथवा मानसिक श्रम करणारे कामगार या सर्वांच्या हितसंबंधाचें संगोपन व संरक्षण केलें पाहिजे. खाजगी उद्योगधंद्यांना राष्ट्राच्या आर्थिक व्यवस्थेंत फार महत्त्वाची विधायक कामगिरी करावयाची आहे. त्यांनीं आपल्या वरील सामाजिक जबाबदाऱ्यांची जाणीव ठेवली तर ही कामगिरी त्यांना अधिक उपयुक्तपणें पार पाडतां येईल.

---

### डायरेक्टरांच्या निवडणुकींत गोळ्या झाडल्या

कोईमतूर येथून ४५ मैलांवर असलेल्या उडुमलपेठ गांवीं पालानी अन्दावर टेक्सटाईल मिलच्या शेअर होल्डर्सची सभा नवीन डायरेक्टर्स निवडण्याकरितां चालू असतां, एका डायरेक्टरनें दुसऱ्या दोन डायरेक्टरांवर गोळ्या झाडल्याचें वृत्त पोलिसांना मिळालें आहे.

श्री. रुद्राप्पन आणि श्री. विद्यासागर या दोघांना जिल्हा इस्पितळांत दाखल करण्यांत आलें. श्री. रुद्राप्पन् यांना पोटांत दोन व उजव्या हाताला एक अशा जखमा झाल्या. ते नंतर दगावले. दुसऱ्याला मात्र जुजबी जखम आहे. गोळी झाडणारा फरारी आहे.

## येती महाराष्ट्र औद्योगिक व व्यापारी परिषद्

महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळाची सभा बुधवार दि. ६ एप्रिल रोजीं प्रा. धनंजयराव गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. महाराष्ट्र औद्योगिक आणि व्यापारी परिषदेचें पुढील अधिवेशन येत्या जून महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यांत भरविण्यांत यावें असा निर्णय या सभेंत घेण्यांत आला.

या परिषदेचें कार्य निरनिराळ्या समित्यांमार्फत व्हावयाचें असून महाराष्ट्राच्या आर्थिक जीवनाच्या सर्व महत्त्वाच्या अंगोपांगांची चर्चा करण्याकरितां पुढील विषय-समित्या नेमण्यांत याव्या असें ठरलें.

१. नव्या महाराष्ट्राकरितां तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत किमान अपेक्षा.

२. आर्थिक प्रश्न आणि राज्य सरकारचीं अर्थविषयक धोरणें.

३. उद्योगधंदे, कामगार व तांत्रिक शिक्षण.

४. शेतकी.

५. महाराष्ट्रांतील अविकसित विभागाचे विशेष प्रश्न.

६. वाहतूक, दळणवळणाचीं साधनें आणि विद्युत्-पुरवठा.

परिषदेचें अधिवेशन तीन दिवस चालेल. त्या वेळीं निरनिराळ्या महत्त्वाच्या विषयांवर बोलण्याकरितां प्रमुख पाहुण्यांना निमंत्रण देण्यांत यावें असें मंडळानें ठरविलें आहे.

वरील सहा विषयांची चर्चा करण्याकरितां मसुदे तयार करण्यांत यावयाचे आहेत. व ह्या कामास साहाय्य करण्यासाठी तज्ज्ञ, उद्योगपती आणि व्यापारी यांना विनंती करण्यांत यावयाची आहे.

डेकन ॲग्रिकल्चरल असोसिएशन, पुणें ह्या संस्थेच्या विद्यमानें महाराष्ट्रांतील शेतकी विषयक प्रश्नांचा व शेतीची सध्यांची परिस्थिति सुधारण्याकरितां आवश्यक असलेल्या उपाययोजनांचा विचार करण्याकरितां जी शेतकी परिषद् भरविण्यांत येणार आहे तीस या मंडळानें सर्व प्रकारचें सहकार्य व साहाय्य द्यावें असें ठरलें.

मंडळाच्या या सभेस पुढील संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

प्रा. धनंजयराव गाडगीळ ( अध्यक्ष ), श्री. भा. दि. गरवारे ( चेअरमन ), श्री. म. ना. गोगटे ( सन्माननीय कार्यवाह ), श्री. कृ. ह. ढमढेरे ( अध्यक्ष, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, मुंबई ), श्री. प्रतापसिंह मथुरादास ( अध्यक्ष, इंडियन मर्चंट्स चेंबर ), श्री. शंतनुराव किर्लोस्कर ( अध्यक्ष, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज, पुणें ). श्री. ग. वि. पुराणिक ( चेअरमन, ऑल इंडिया मॅन्युफॅक्चरर्स ऑरगनायझेशन ), श्री. वल्लभदास मरीवाला ( उपाध्यक्ष, इंडियन मर्चंटस चेंबर ) श्री. रामकृष्ण जे. बजाज आणि श्री. भारत जी. दोशी ( उपाध्यक्ष, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स ), श्री. डायाभाई सुतारीया ( उपाध्यक्ष, नाग-विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स नागपूर ), श्री. शां. म. डहाणूकर, श्री. व्ही. एस्. देवल ( सन्माननीय कार्यवाह, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, पुणें ), श्री. राधाकिसन राणा ( सन्माननीय कार्यवाह, मराठवाडा चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रीज, जालना ), श्री. वायू. ए. फॉझलभॉय, श्री. हेमंतकुमार जे. वैद्य, श्री. द. रा. नाईक, श्री. व्ही. आर. सोनाळकर आणि श्री. रा. ग. मोहाडीकर ( कार्यवाह, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स ).

## ब्रिटिश वकील नेमण्यास हुंडणावळ नाकारली

### डालमियाचा सरकारविरुद्ध अर्ज

रामकृष्ण डालमियाला भारत विमा कंपनीच्या २ कोटी रुपयांच्या अपहाराचे आरोपाखाली दोन वर्षांच्या कैदेची शिक्षा झाली होती. त्यांनीं हायकोर्टाकडे अपील केलें असून तोंवर तो जामिनावर मोकळा आहे. मि. डिंगल फूट ह्या इंग्रज वकिलाला वकीलपत्र देण्याचें त्यानें ठरविलें आणि त्याच्या येता-जाताच्या विमानाच्या प्रवासाच्या रकमेइतके पौंड रुपयांची बदली मिळावेत, असा डालमियानें रिझर्व्ह बँकेस अर्ज केला. पण, असिस्टंट कंट्रोलरनें त्याला नकार दिला. "मि. डिंगल फूट ह्या इंग्रज नागरिकाला वकील म्हणून देण्यास तुम्हांला आम्हीं संमति देऊं शकत नाहीं आणि इथं रुपये भरून त्याच्या येण्या-जाण्याच्या खर्चासाठी रुपये पत्करून त्याच्या तिकिटाची सोय करूं शकत नाहीं" असें त्याच्या पत्रांत म्हटलें होतें. घटनेच्या २२ ( १ ) कलमांतील मूलभूत हक्कांचा त्यामुळें बाध येतो; ( स्वतःच्या निवडीचा वकील नेमण्याचा आणि त्याचे करवीं बचाव करण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे, असें त्या कलमांत म्हटलें आहे; ) रिझर्व्ह बँकेनें आपल्या ह्या हक्कावर गदा आणली आहे अशी डालमियाची तक्रार असून त्याप्रमाणें त्यानें पंजाब हायकोर्टाच्या सर्कीट बेंचाकडे रिट् पिटिशन दाखल केला आहे. "अर्जदाराला स्वतःचा योग्य बचाव करतां येऊं नये, असा सरकारचा दुष्ट हेतु असल्याचें हें आणखी एक निदर्शक आहे." असेंहि डालमियानें अर्जांत म्हटलें आहे.

---

## आरे येथें डेअरी टेक्नॉलॉजी इन्स्टिट्यूट

### दोन वर्षांचा अभ्यासक्रम

आरे दूध केंद्रांत डेअरी टेक्नॉलॉजी इन्स्टिट्यूट स्थापन करण्याच्या योजनेस मुंबई सरकारनें मान्यता दिली असून, ह्या संस्थेंत इंडियन डेअरी डिप्लोमाचा दोन वर्षांचा अभ्यासक्रम सुरू करण्यांत येईल. ह्या डिप्लोमा अभ्यासक्रमानुसार डेअरी मॅनेजरांना शिक्षण देण्यांत येईल. सबंध देशभर विकास करण्यांत येणाऱ्या अनेक डेअरी योजनांमुळें त्यांना चांगला फायदा होईल.

ह्या डिप्लोमाच्या अभ्यासक्रमास येत्या जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासून सुरुवात होणार असून २५ ते ३० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याचें योजिलें आहे.

आरे दूध केंद्रांत असलेलीं २०,००० पेक्षा अधिक गुरें व दररोज हाताळण्यांत येणारे ५,००० मण दूध, ह्या सोयीचा शिक्षणासाठी उपयोग करण्यांत येईल.


अशा प्रकारें विद्यार्थ्यांना एका मोठ्या डेअरींत शिक्षण मिळेल व शिक्षणाच्या कारकीर्दीत अमूल्य अनुभव मिळेल. विद्यार्थ्यांची राहण्याची सोय आरे येथील न्यूझीलंड वसतिगृहामध्यें करण्यांत येईल.

डेअरी डिप्लोमा अभ्यासक्रमामध्यें मोठ्या प्रमाणावर प्रात्यक्षिक शिक्षण देण्यांत येईल. एस्. एस्. सी. परीक्षा अथवा तत्सम परीक्षा किंवा सीनियर कॅंब्रिजची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना या वर्गांत प्रवेश मिळेल.

याबाबतची आणखी तपशीलवार माहिती डायरेक्टर, डेअरी टेक्नॉलॉजी इन्स्टिट्यूट, आरे मिल्क कॉलनी, मुंबई-६५ येथें मिळूं शकेल.

**STURDY** **STABILITY**

*Elegence* *Precision*




Great pyramids and sphynx in Egypt are a puzzle to the modern world. They possess incredible intricacy of sturdiness and craftsmanship. They stand centuries together undamaged—Really a wonderful example for sturdiness. As well it is miracleously intricated with craftsmanship. Very few are the examples of such type where sturdiness & elegance go hand in hand.

Similarly in machinery world of today, sturdiness and precision workmanship is well needed. A slightest mistake in designing and workmanship means- an immeasurable loss of money, time and work.

***We stand for....***

- Cams & keys of various types.
- Plastic & Rubber plantation equipment, Extruders, Spreading machines & mixing mills.
- Chemical Engineering equipment, Auto-cloves, pressure-pans, Kiers etc.
- Calenders, Beaters and presses of various types
- Die-punches & moulds.

***For success***



**THE SOUTHERN MACHINE INDUSTRIES**
GULTEKDI ROAD, SWARGATE, POONA 2.

Phone : 6640
Gram : 'SOUMACHINE'

Proprietor . SUPANEKAR BROS.

PARKERSON—



**कण आणि क्षण**
( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )
लेखक : – श्री. वा. काळे, संपादक 'अर्थ''
मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. २ रु. ८ आ.



**'अर्थ' ग्रन्थमाला**
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली ४ सहकार


हें पत्र पूर्णे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनी छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.